म्हाइंभट:

ह्यांची थोडी ओळख आपल्या ससिक रक्षण पाठच्या सुरुवातीला आलीच आहे त्यानुसार म्हाइंभट हे महानुभाव पंथाचे एक अनुयायी ज्यांनी लीळाचरित्र हा ग्रंथ लिहिला. पंथाचे अनुयायी होण्याआधी गणपती आपयो हे त्यांचे गुरु होते. त्यांच्यापाशी सुरुवातील विद्या शिकून नंतर त्यानी तेलंगणात पुढील विद्या मिळवली. म्हाइंभट हे सराळे गावचे एक गर्भश्रीमंत ब्राह्मण होते.आपल्या विद्वत्तेचा त्यांना अतिशय गर्व होता त्यामुळे इतरांना ते तृणवत (गवतासमान) लेखत. त्याचे प्रतिक म्हणून ते पायात गवताची वाकी घालीत.परंतु चक्रधरांशी भेट झाल्यावर व चक्रधरस्वामिनी संस्कृत आणि मराठी या दोन्ही भाषांतून केलेल्या प्रभावी प्रवचनामुळे म्हाइंभटांचा गर्व उतरला आणि चक्रधरांना त्यानी आपले गुरु मानले. मुळच्या श्रीमंत असलेल्या म्हाइंभटांनी पंथाची दीक्षा घेतल्यावर तेथील भिक्षान्न खाणे फार जड गेले परंतु त्याची सवय त्यांनी करून घेतली. शिवाय आपली संपत्ती त्यांनी गुरुसेवेस लावली.

म्हाइंभटांनी १२०५ म्हणजे आजपासून सुमारे आठशे वर्षांपूर्वी लीळाचरित्र हा ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथाचे विशेष म्हणजे हा मराठीतला आद्य चरित्रग्रंथ म्हणजे आजच्या भाषेत चरित्र आहे..ह्या चरित्रग्रंथात चक्रधरस्वामी यांचे सविस्तर चरित्र, त्यांच्या आठवणी व आख्यायिका यांच्या रूपाने आले आहे.म्हाइंभटांनी चक्रधरांच्या पश्चात त्यांच्या सहवासात असलेल्या त्यांच्या अनेक शिष्यांना विचारून व त्यातील खऱ्याखोट्याची पारख करून घेऊन लिहिलेले आहे.

अशा ह्या म्हाइंभटांनी लिहिलेल्या लीळांचे मुळात तीन भाग आहेत. एकाक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध. आपल्या पाठ्यपुस्तकातील ससिक रक्षण ही ‘लीळा’म्हणजे चक्रधरांविषयीची आठवण ‘एकाक’ ह्या १ल्या भागातून घेतली आहे.

संदर्भ:

लीळाचरित्र, पूर्वार्ध-भाग १, संपादक डॉ. श. गो. तुळपुळें, सुविचार प्रकाशन मंडळ. आ. तिसरी-१९८५